दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक २१ • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार दि.११ नोव्हेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# सहकाऱ्यांच्या बेईमानीमुळे अमरावतीत फटका बसला:देवेंद्र फडणवीसांची बच्चू कडूंवर टीका

## नवनीत राणांचा आधुनिक झाशीची राणी असा उल्लेख

**अमरावती (वृत्तसंस्था)**–मेळघाटाने नवनीत राणा यांना ज्याप्रकारे समर्थन दिले, त्यासाठी मी सर्वांना धन्यवाद देतो. आमच्या सहकाऱ्यांनी धोका दिला नसता, तर फक्त मेळघाटाच्या जोरावर १६ हजारांची लीड संपवली असती. आपल्या नवनीत ताई लोकसभेत गेल्या असत्या, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी नाव न घेता बच्चू कडू यांच्यावर टीका केली. पण आता विधानसभा निवडणुकीत मेळघाट असे मतदान करेल, की संपूर्ण अमरावतीचा रेकॉर्ड मेळघाटमध्ये तुटेल, हा विश्वास आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज अमरावती येथे जाहीर सभा पार पडली. या सभेत देवेंद्र फडणवीसांनी नवनीत राणा यांचा आधुनिक झाशीची राणी असा उल्लेख केला. नवनीत राणा मेळघाटच्या कन्या आहेत, तर मी पण येथील मुलगा आहे. मेळघाटशी माझे नाते जुने आहे. माझ्या आजोबाचे घर चिखलदऱ्यात आहेत. मी लहानपणी इथे यायचो आणि रहायचो, असे फडणवीसांनी सांगितले. जो राम को लाये हैं, उनको आपको लाना है. हमने हमारा काम किया हैं, अब आप की बारी हैं, असे आवाहनही फडणवीसांनी केले.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नवनीत राणा यांनी मेळघाटसाठी ज्या मागण्या केल्या, त्या पूर्ण करु. दुधाला जास्त भाव मिळावा यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. महाविकास आघाडी सरकार आल्यावर येथील कामावर रोख लागली. स्काय वॉकचे काम थांबवण्याचे पाप महाविकास आघाडीच्या सरकारने केले. निवडणुकीआधी आणि नंतरही नवनीत राणांनी मेळघाटशी संपर्क ठेवला. मेळघाट हा त्यांचा परिवार आहे. नेर ते खंडवापर्यंतचा रस्ता पूर्ण करायचा आहे, अशी राणांची मागणी आहे. याचे श्रेय ते मला देतात. पण कारवाई त्यांनी करुन घेतली. स्काय वॉकचेही काम पूर्ण होणार आहे. तुम्ही प्रपोजल करा. पूर्ण करायची जबाबदारी माझी आहे. येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना २४ तास मोफत वीज मिळेल, अशी घोषणा फडणवीसांनी केली.



## ‘तुला पुराच करून टाकतो’ ;आमदार महेंद्र थोरवेंची कार्यकर्त्याला धमकी

**कर्जत | प्रशांत कुंडकर**

कर्जतमध्ये आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडून विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्याला धमकी दिल्याचा प्रकार आज (दि.१०) समोर आला आहे. या घटनेमुळे कर्जतमधील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.



कर्जत मतदार संघात आमदार महेंद्र थोरवे प्रचार दौऱ्यावर असताना कडाव येथे रॅलीमध्ये सहभागी झाले होते. या दरम्यान राष्ट्रवादीचे माजी ज्येष्ठ कार्यकर्ते मनोहर पाटील हे मोटारसायकल वरून प्रवास करीत होते. यावेळी त्यांना आमदार थोरवे यांनी अडवून दमदाटी करून शिवीगाळ केली. मनोहर पाटील हे अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांचा प्रचार करीत आहेत. दरम्यान, आमदार थोरवे यांच्या या कृतीमुळे विरोधकांना आयते कोलीत मिळाले आहे.

सध्या कर्जतमध्ये राजकीय वातावरण तापले आहे. कर्जत मध्ये शिवसेना शिंदे गटातून महेंद्र थोरवे, अपक्ष उमेदवार सुधाकर घारे, शिवसेना ठाकरे गटातून नितीन सावंत अशी तिरंगी लढत होत आहे. घर टू घर प्रचार सुरू आहे. या प्रचारादरम्यान तिन्ही पक्षांचे कार्यकर्ते एकाच गावात येणार नाहीत, याची दक्षता पोलीस यंत्रणा घेत आहे. मात्र, तरीही आज झालेल्या घटनेमुळे पोलीस यंत्रणेवरील ताण वाढण्याची शक्यता आहे.

## महाराष्ट्र हादरला.! २ वर्षांच्या मुलीवर बलत्कार करून नाजूक भागात लाटणे घुसवून हत्या; सावत्र बापाचे भयानक कृत्य

**मुंबई | प्रशांत कुंडकर**

नात्याला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. नात्यात अडथळा ठरत असल्याच्या रागातून एका नराधमाने दोन वर्षांच्या सावत्र मुलीवर बलात्कार करून, या चिमुकलीच्या नाजूक भागात लाटणे घुसवून तिचा गळा आवळत हत्या केल्याची घटना घडली आहे.



हि घटना ८ नोव्हेंबर रोजी मानखुर्द येथे दुपारच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी नराधामाला बेड्या ठोकल्या आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या चिमुकलीच्या आईने पहिल्या पतीपासून घटस्फोट घेतला होता. त्यानंतर दोघी मायलेकी आरोपीसोबत राहत होत्या. आरोपीला ही मुलगी त्यांच्या नात्यामध्ये अडथळा वाटू लागली. त्यावरून त्या दोघांमध्ये सारखे वाद निर्माण होऊ लागले. या दोघांमधील भांडणाचा राग आरोपी त्या चिमुकलीवर काढू लागला.

दरम्यान, या मुलीची आई शुक्रवारी दुपारी नेहमीप्रमाणे घरकामासाठी बाहेर गेली. त्यावेळी आरोपीने मिळालेल्या संधीचा फायदा उचलत चिमुकलीवर बलात्कार केला. तसेच चिमुकलीच्या नाजूक भागात लाटणे घुसवून, तिचा गळा आवळून हत्या केली आहे. दुपारच्या वेळी मुलीची आई घरी परतली तेव्हा मुलगी बेशुद्धावस्थेत होती. तिला तात्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तिचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

बलात्कार करून सावत्र बापाचे भयानक कृत्य

या मुलीच्या अंगावर मारहाणीच्या तसेच गळा आवळल्याच्या खुणा पोलिसांच्या निदर्शनास आल्या आहेत. तर तिच्या नाजूक भागावर जखमा देखील होत्या. तेथून रक्तस्त्रावही होत होता. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून, पोलिसांनी आरोपीला जाब विचारताच त्याने मुलीवर बलात्कार करून हत्या केल्याची कबुली दिली आहे. भारतीय न्याय संहितेसह पोक्सो कायद्यातील गंभीर कलमांनुसार आरोपीवर हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मटणाच्या दोन बोटींसाठी पार्टीत गेला,विहिरीत पडून जीव गेला

## पांझुर्णी येथील ग्रामपंचायत सदस्य गजानन काळे यांचा मृत्यू


## फत्तापूर येथे काँग्रेस समर्थक प्रमोद मगरे यांच्या पार्टीतील दुर्दैवी घटना

### राजकीय पक्षांकडून आचारसंहितेचे उल्लंघन


**निवडणुकांच्या काळात कार्यकर्त्यांना खुश करण्यासाठी राजकीय पक्ष विविध प्रकारच्या पार्टींचे आयोजन करतात, ज्यात मांसाहार आणि दारूचा समावेश असतो. नियमांपासून दूर, कमी वर्दळीच्या ठिकाणी या मेजवानींचे आयोजन करून आचारसंहितेचे उल्लंघन केले जाते. या प्रकारात भरारी पथकाने कोणतीही कारवाई न केल्यामुळे विविध चर्चांना उधाण आले आहे, तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यप्रणालीवरही शंका उपस्थित होत आहे.**

### निवडणूक काळात वाहतो दारूचा महापूर

**ग्रामपंचायत असो वा खासदार–आमदार निवडणूक, दारू आणि पैशांच्या जोरावर मतदारांचा लिलाव केला जातो. राज्य उत्पादन शुल्क विभाग मात्र लहान व्यावसायिकांना त्रास देण्यात व्यस्त असतो, तर मोठ्या प्रमाणावर दारू वितरणाकडे दुर्लक्ष करते. या कार्यपद्धतीकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.**



घटनास्थळी असलेले मटनाच्या फोडी



घटनास्थळी पोलीस पथक व अरूण महल्ले

**वरोरा | प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील फत्तापूरजवळील पीएचएम मेटल्स परिसरात रविवारी काँग्रेस उमेदवार प्रविण काकडे यांचे समर्थक प्रमोद मगरे यांच्या आयोजनात कार्यकर्त्यांसाठी मांसाहारी भोजन आणि दारू पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. पार्टीला अंदाजे ५०० कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांनी हजेरी लावली होती, ज्यात मटण आणि दारूचा विशेष आकर्षण होता.

पार्टीदरम्यान काँग्रेसचे वरोरा तालुका अध्यक्ष मिलिंद भोयर यांनी अरुण महल्ले (वंधली) आणि त्यांचे आतेभाऊ, पांझुर्णी येथील ग्रामपंचायत सदस्य गजानन काळे (वय ५२) यांना पार्टीत सामील केले. भोजनादरम्यान दोघे दारूचे पॅग घेत असताना जवळच्या विहिरीकडे गेले. विहिरीवर अर्धवट मँट टाकलेले असल्यामुळे ती सुरक्षित नसल्याचे त्यांच्या लक्षात आले नाही, त्यामुळे अरुण महल्ले आणि गजानन काळे विहिरीत पडले. पोहता येत असल्यामुळे अरुण महल्ले यांनी स्वतःचा जीव वाचवला, परंतु गजानन काळे यांना पोहता येत नसल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.या घटनेत दुःखद म्हणजे, पार्टीत उपस्थित असलेल्या ५०० हून अधिक व्यक्तींपैकी कोणत्याही व्यक्तीने मदतीचा हात पुढे केला नाही. सर्व जण दारू–मटणाचा आनंद घेत होते आणि घटना लक्षात येताच घटनास्थळावरून निघून गेले. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पोलिस ठाणेदार अजिंक्य तांबडे, उपनिरीक्षक विलास बलकी आणि शिपाई विशाल राजूरकर यांनी घटनास्थळी पंचनामा केला. गजानन काळे यांचा मृतदेह सोमवारी सकाळी शोधण्यात येईल, असे ठाणेदारांनी सांगितले.



वाचलेले अरूण महल्ले



हीच ती विहिर त्या मध्ये गजानन काळे यांचा मृत्यू झाला

## पंतप्रधानांच्या दौऱ्यानिमित्त चिमूर येथे वाहतूक व्यवस्थेत बदल

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंगळवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी चिमुर येथे आयोजित सभेनिमित्त होणाऱ्या संभाव्य गर्दीमुळे वाहतूक कोंडी होऊ नये, याकरिता महाराष्ट्र पोलिस अधिनियम–१९५१ च्या कलम–३३(१) (ब) नुसार सार्वजनिक ठिकाणी सुरळीत रहदारी व सुव्यवस्था राखण्यासाठी वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ ते ५ वाजेपर्यंत भिसी ते पिंपळनेरीपर्यंत व जांभुळघाट ते आर.टी.एम कॉलेज, चिमुरपर्यंत सर्व प्रकारची जड वाहतूक बंद राहील. इतर वाहनांना चिमुर जाण्यासाठी आर.टी.एम कॉलेज–नेरी रोड मार्गे चिमुर बायपास मार्गे चिमुर शहरात जाता येईल. त्याचप्रमाणे नेरी ते आर.टी.एम कॉलेज चिमुर पर्यंत सर्व प्रकारची जड वाहतूक बंद राहील. इतर वाहने नेरी–चिमुर बायपास मार्गाने चिमुर शहरात जातील व बायपास मार्गेच बाहेर पडतील.

त्याचप्रमाणे हजारे पेट्रोलपंप ते आर.टी.एम कॉलेज पर्यंत, हजारे पेट्रोलपंप ते संविधान चौक चिमुर वडाळा पैकु पर्यंत व हजारे पेट्रोलपंप ते नेहरू चौक चिमुर पर्यंत सर्व प्रकारची वाहतूक बंद राहील. तसेच वरोराकडून चिमुर शहरात जाण्यासाठी हलक्या वाहनांना नेहरू चौक या मार्गाचा अवलंब करता येईल. या सर्व मार्गांवर सभेकरीता येणाऱ्या वाहनांना प्रवेश राहणार असून आवश्यकतेनुसार सदर कालावधीत ठराविक वेळेकरीता सर्व प्रकारची वाहतुक बंद करण्यात येणार आहे.

या कालावधीत अवजड वाहतुकदारांना पुढील पर्यायी मार्गांचा वापर करता येणार आहे.

१. भिसी ते चिमुर–वरोरा–चंद्रपुर जाण्यासाठी कन्हाळगांव–महालगांव–तिरपुरा–गदगांव या रोडचा अवलंब करावा. २.जांभुळघाट ते चिमुर किंवा वरोरा–चंद्रपुर जाण्यासाठी भिसी–कन्हाळगांव–महालगांव–तिरपुरा–गदगांव या रोडचा अवलंब करावा. ३.नेरी वरून चिमुर किंवा वरोरा–चंद्रपुर–भिसीला जाण्यासाठी जाण्यासाठी जांभुळघाट भिसी–कन्हाळगांव–महालगांव–तिरपुरा–गदगांव या रोडचा अवलंब करावा. ४.वरोरा कडुन भिसी–जांभुळघाटला जाण्यासाठी गदगाव–तिरपुरा–महालगांव–कन्हाळगांव या मार्गाचा अवलंब करावा.

गर्दीमुळे वाहतूक कोंडी निर्माण होऊ नये याकरिता सर्व प्रकारच्या वाहतुकदारांनी पर्यायी मार्गांचा अवलंब करून सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशात नमुद आहे.

# आता भाजपकडून लाडक्या बहिणींना धमकविण्याचे काम सुरू- विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी टीका

## राज्यात महिला असुरक्षित, आणि लाडकी बहीण नावाखाली महिलांची दिशाभूल करण्याचा महायुतीचा प्रयत्न – शिवानी वडेट्टीवार





**ब्रह्मपुरी । प्रतिनिधी**
विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या मतदारसंघात आज गांगलवाडी इथे महिला मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.
२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत अबकी बार महंगाई पे वार, म्हणून मोदी सरकारने खोटे बोलून सत्तेवर येताच देशातील मोजक्या उद्योगपतींचे हित जोपासत प्रचंड महागाई वाढविली. तर राज्यात फडणवीस व त्यानंतरच्या घटनाबाह्य खोके सरकारने राज्यातील शेतकरी, शेतमजूर,कामगार, नोकरदार यांचा भ्रमनिरास केला. लोकसभेत फटका बसला म्हणून लाडकी बहिण योजना आणली पण आता याच योजनेवरून हे भाजपवाले महिला भगिनींना धमकावत आहे. भाजप खासदार महाडिक यांनी भर सभेत १५०० रुपये घेऊन काँग्रेसच्या मेळाव्यात जाणाऱ्या महिलांवर लक्ष ठेवा, फोटो काढा सांगितले इतकेच नाहीतर त्यांची व्यवस्था करतो अशी धमकी दिली. भाजप काय आपल्या खिशातून राज्यातील महिलांना निधी देत आहे का? लाडक्या बहिणींना भाजपकडून धोका आहे, असे चित्र आहे. म्हणूनच महायुती सरकारला सत्तेतून हाकलून लावा. अशी टीका राज्याचे विरोधी पक्षनेते, तथा ब्रम्हपुरी विधानसभेचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले.
आयोजित कार्यक्रमास विमुक्त जाती भटक्या जमाती प्रदेशाध्यक्ष पल्लवी रेणके, ब्रम्हपुरी तालुका काँग्रेस अध्यक्ष खेमराज तिडके, कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती प्रभाकर सेलोकर, माजी जिल्हा परिषद सभापति डॉ. राजेश कांबळे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमूरकर, कम्युनिस्ट पक्ष नेते विनोद झोडगे, जिल्हा उपाध्यक्ष विलास विखार ,युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस शिवानी वडेट्टीवार , कल्पना गेडाम, मंदा चौके, किशोर राऊत,प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.
पुढे बोलतांना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, देशातील व राज्यातील हे महापापी सरकार उद्योगपतीचे कर्ज माफ करते पण शेतकऱ्यांना मात्र देशोधडीला लावले आहे. मोदी सरकार आले तेव्हा तर पंधरा लाख देऊ असे आश्वासन दिले आता १५०० रुपये दिले आणि गाजावाजा करत आहेत.
ब्रह्मपुरी मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी गोसेखुर्द प्रकल्पाचे ५ हजार कोटीचे काम आघाडी सरकार असताना सुरू केले. या प्रकल्पाला निधी मिळावा म्हणून झगडावे लागले पण यामुळे संपूर्ण क्षेत्रातील ८०% शेती ओलिताखाली आली आहे. तसेच मतदारसंघातील रस्ते, घरकुल योजना, शैक्षणिक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांकरिता वस्तीगृहे, वाचनालय, गावागावात सामाजिक सभागृहे, शुद्ध पेयजल योजना, क्रीडांगणाचा विकास, आरोग्य व प्रशासकीय सेवेसाठी प्रशस्त इमारती यासाठी आमदार म्हणून आपल्या कामाचा लेखाजोगा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मांडला.ब्रह्मपुरी मध्ये मी लोकप्रतिनिधी नाही तर तुमचा भाऊ म्हणून काम करतो, भगिनींच्या पाठीशी वेळोवेळी उभा राहील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.
याप्रसंगी मार्गदर्शनपर युवक काँग्रेस सरचिटणीस शिवानी वडेट्टीवार म्हणाल्या की, भाजपकडे टीका करण्यासारखे काहीच नसल्याने खोटे बोलून रडीचा डाव सुरू आहे. राज्यात प्रचंड महागाई, बेरोजगारी वाढली असून मोठया प्रमाणात गुन्हेगारी फोपावली आहे. लाडकी बहीण सांगून भ्रष्ट महायुतीच्या भूल थापाना बळी पडू नका, असे आवाहन त्यांनी केले.
यानंतर मंचावरील ब्रम्हपुरी काँग्रेसचे खेमराज तिडके, डॉ.राजेश कांबळे, प्रमोद चिमूरकर व मंदा चौके, यांनी काँग्रेस पक्षाची ध्येय धोरणे तथा ब्रम्हपुरी आमदार विजय वडेट्टीवार यांच्या विकास कामांची माहिती आपल्या मनोगतातून उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहूल मैंद,प्रास्ताविक कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती प्रभाकर सेलोकर यांनी केले. आयोजित मेळाव्यास गांगलवाडी परिसरातील बहुसंख्येने महिला भगिनी व नागरिक उपस्थित होते.

# खासदार बाल्यामामा म्हात्रे महाविकास आघाडीतील उमेदवारांसाठी मैदानात उतरले

**बदलापूर । प्रतिनिधी**
विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून मुरबाड-शहापूर मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात तीव्र चुरस पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, भिवंडी लोकसभा क्षेत्राचे खासदार बाल्यामामा म्हात्रे हे महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी मैदानात उतरल्याचे दिसून येत आहे. उमेदवारांनी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख संपली असूनही बंडखोर उमेदवारांनी माघार न घेता निवडणुकीला सामोरे जाण्याचा निर्णय घेतल्याने महायुतीसमोर अडचणी वाढण्याची शक्यता आहे.
मुरबाडमध्ये राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार सुभाष पवार यांना बंडखोर उमेदवारांमुळे फटका बसण्याची चिन्हे आहेत. निवडणुकीच्या ऐन तोंडावर पवार



यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला असून, त्यांना उमेदवारी मिळाल्याने पक्षातील पदाधिकारी नाराज असल्याची चर्चा आहे. याच पार्श्वभूमीवर, शैलेश वडनेरे यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी जाहीर केल्याने सुभाष पवार यांच्यासमोर आव्हान उभे राहिले आहे. त्यातच महायुतीचे उमेदवार किसन कथोरे आणि वडनेरे यांचे तगडे आव्हान सुभाष पवार यांना आहे.
शहापूर मतदारसंघात राष्ट्रवादी शरद पवार गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटात निष्ठेची लढाई रंगणार आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे अपक्ष उमेदवार अविनाश शिंगे यांनी सुरुवातीला बंडखोरी केली होती; मात्र खासदार बाल्यामामा म्हात्रे यांच्या मध्यस्थीनंतर त्यांनी माघार घेत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार पांडुरंग बरोरा यांना पाठिंबा दिला. बरोरा यांना महायुतीचे उमेदवार दौलत दरोडा आणि जिजाऊ संघटनेच्या अपक्ष उमेदवार रंजना उघडा यांचे तगडे आव्हान आहे.
भिवंडी लोकसभा क्षेत्रांतर्गत येणाऱ्या मुरबाड-शहापूर या दोन्ही मतदारसंघात म्हात्रे यांच्या अस्तित्वाची लढाई असल्याचे बोलले जात आहे. भिवंडी लोकसभेत पहिल्यांदाच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार म्हणून म्हात्रे यांनी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांचा पराभव केला होता. पक्षाने म्हात्रे यांच्या खांद्यावर भिवंडी लोकसभा अंतर्गत विधानसभा क्षेत्रांची जबाबदारी दिल्याने त्यांची शहापूर-मुरबाड मतदारसंघांवर बारीक नजर आहे, असे सांगितले जात आहे.

# पंतप्रधानांच्या दौऱ्या निमित्त जिल्ह्याच्या हद्दीत ड्रोन उडविण्यास मनाई

## जिल्हाधिकाऱ्यांनी पारीत केले आदेश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा १२ नोव्हेंबर रोजी चिमूर येथे दौरा असून या कार्यक्रमाच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे तसेच अवकाशीय उपकरणाद्वारे नियोजित संभाव्य हल्ल्याची शक्यता रोखण्याकरीता चंद्रपूर जिल्ह्याच्या हद्दीत विना परवाना व बेकायदेशीर रित्या ड्रोनचा वापर करण्यास मनाई आदेश पारीत करण्यात आला आहे.
भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ च्या तरतुदीन्वये चंद्रपूर जिल्ह्याच्या हद्दीत १२ नोव्हेंबरच्या मध्यरात्री ००.०१ वाजतापासून १२ नोव्हेंबरच्या रात्री २४.०० वाजेपर्यंत विना परवाना व



बेकायदेशिररित्या ड्रोन प्रक्षेपण व ड्रोनचा वापर करण्यास जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या सही व शिक्यानिशी सदर आदेश पारीत करण्यात आले आहे.

# घरी बसून चालणारे सरकार नको,जनतेत मिसळणारे महायुती सरकार सत्तेवर आणा-रावसाहेब दानवे

**राहुरी । प्रतिनिधी**
राज्यात २०१९ मध्ये जनतेने भाजप-शिवसेना युतीला सत्तेवर आणले होते. मात्र, मुख्यमंत्रीपदाच्या इच्छेपोटी उद्धव ठाकरे यांनी जनादेश नाकारून काँग्रेस-राष्ट्रवादीशी हातमिळवणी केली. त्यांनी शेतकरी व जनतेच्या हिताचा कोणताही ठोस निर्णय घेतला नाही, असा आरोप माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे पाटील यांनी केला. ते राहुरी विधानसभा मतदारसंघातील भाजप उमेदवार माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रचार सभेत बोलत होते.
कोविड काळात भाजपचे नेते रस्त्यावर उतरून जनतेला मदत करत होते, शेतकऱ्यांच्या




बांधावर जात होते, तर ठाकरे मातोश्रीवर बसून 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' म्हणत होते, असे दानवे यांनी सांगितले. महाविकास आघाडीच्या अडीच वर्षांच्या काळात राज्यात विकास प्रक्रियेला खीळ बसली. आता मात्र भाजप महायुतीला बहुमत देऊन शिवाजीराव कर्डिले यांना विधानसभेवर पाठवा, असे आवाहन त्यांनी उपस्थित जनसमुदायाला केले.
सभेत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले, ज्येष्ठ नेते सुभाष पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, तालुकाध्यक्ष सुरेश बनकर, राजू शेटे, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले, धनराज गाडे, उदयसिंह पाटील आदी मान्यवर आणि वांबोरी परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुंड पाठवून सभेत गोंधळ घालता? ताईंनो... आमदार प्रशांत बंब यांचा विरोधकांवर संताप

**गंगापूर । प्रतिनिधी**
राज्यभरात विधानसभा निवडणुकीचे तापमान वाढले असताना गंगापूर-खुलताबाद मतदारसंघातील भाजप आमदार प्रशांत बंब यांनी विरोधकांवर कठोर शब्दांत टीका केली आहे. बंब यांच्या सभेत गोंधळ घालण्याचा प्रयत्न होत असल्याने ते संतापले असून, त्यांनी थेट राष्ट्रवादी काँग्रेसचे मराठवाड्याचे पदवीधर आमदार सतिश चव्हाण यांना जाहीर आव्हान दिले आहे.
प्रशांत बंब यांनी रांजणगाव शेणपुंजी येथील सभेत बोलताना विरोधकांवर निशाणा साधला. माझ्या सभेत चार-पाच गुंड प्रवृत्तीचे लोक पाठवून धिंगाणा घालता? मी गावात



जातो, ताईंनो मी हेच सांगतो आणि लोकांना माझे काम पटवतो. पण मुद्दाम काही लोक पाच मिनिटांत उठून प्रश्न विचारतात, जे चुकीचे आरोप असतात. मी त्यांना पुराव्यानिशी उत्तर देतो, असे बंब यांनी सांगितले.
त्यांनी पुढे म्हटले, माझी विकासकामे लोकांपर्यंत पोहोचू नयेत, म्हणून माझी सभा गोंधळात पार पाडण्याचे षडयंत्र रचले जात आहे. पण इथली जनता खुळी नाही, त्यांना सर्व कळते.प्रशांत बंब यांनी सतिश चव्हाण यांना थेट आव्हान देत म्हटले, माझ्या समोर बसून त्यांनी त्यांच्या १७ वर्षांच्या कामांचा लेखाजोखा द्यावा. जर माझ्या १० टक्के कामे देखील त्यांनी केली असतील, तर मी राजीनामा देईन आणि त्यांचा कार्यकर्ता बनून जाईन. या आव्हानामुळे मतदारसंघात राजकीय वातावरण आणखी तापले आहे.

# सोलापूर जिल्ह्याचे पालक मंत्री होणार संजयमामा शिंदे

## संजयबापू घोलप यांचा विश्वास



**सोलापूर । प्रतिनिधी**
आगामी विधानसभेत संजयमामा शिंदे यांचा विजय निश्चित असल्याचे सांगत, काही दिवसांतच ते सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून कार्यभार सांभाळतील, असा विश्वास मनसेचे तालुका अध्यक्ष संजयबापू घोलप यांनी व्यक्त केला आहे. संजयमामा यांना जाहीर पाठिंबा देण्यासाठी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमास मनसेचे सर्व पदाधिकारी आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते, ज्यामुळे संजयमामा शिंदे यांचे नेतृत्व आणि स्थानिक पाठींब्यास स्पष्टपणे अधोरेखित केले गेले.

## निवडणुकीसाठी सज्ज होत आहेत मतदान यंत्र

# चंद्रपूर तहसील कार्यालयात मशीन तयार करण्याची प्रक्रिया

**चंद्रपूर । प्रतिनिधी**
महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदानासाठी केवळ दहा दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. त्यामुळे निवडणुकीच्या कामांची लगबग वाढली असून २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणा-या मतदानासाठी ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यंत्र तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. चंद्रपूर मतदारसंघातील ३९० मतदान केंद्रासाठी मशीन तयार करण्याची प्रक्रिया तहसील कार्यालय, चंद्रपूर येथे सुरू असून दोन दिवसांत संपूर्ण मशीन सज्ज करण्यात येणार आहे.
विधानसभा मतदारसंघासाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. या अनुषंगाने चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात मशीन तयार करण्याची प्रक्रिया तहसील कार्यालयात १० आणि ११ नोव्हेंबर या दोन दिवसांत घेण्यात येत आहे. चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात एकूण ९३६ बॅलेट युनीट, ४६८ कंट्रोल युनीट



आणि ५०३ व्हीव्हीपॅट उपलब्ध आहेत. मशीन तयार करण्याच्या प्रक्रियेसाठी तहसील कार्यालय, चंद्रपूर येथे एकूण ३० टेबल लावण्यात आले आहेत. प्रत्येक टेबलवर ३ कर्मचारी याप्रमाणे एकूण ९० कर्मचा-यांमार्फत ईव्हीएम, व्हीव्हीपॅटसह मशीन सज्ज करण्यात येत आहे. चंद्रपूर विधानसभा मतदारसंघातील ३९० मतदान केंद्रासाठी असलेल्या ईव्हीएमपैकी ५ टक्के म्हणजे १९ मशीन मॉक पोलकरीता रॅन्डम पध्दतीने निवडण्यात आले. प्रत्येक मशीनवर १००० याप्रमाणे दोन दिवसांत १९ मशीनवर १९ हजार मॉक पोल घेण्यात येणार आहे.
अशी असते प्रक्रिया : ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यंत्र तयार करण्याची प्रक्रिया ही उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींसमोर केली जाते. यात मतपत्रिका बॅलेट युनीटला लावून सील करणे, प्रत्येक उमेदवाराला मतदान करून बघणे (मॉक पोल), मतदान झाल्यानंतर व्हीव्हीपॅटच्या चिठ्ठ्या आणि ईव्हीएम चा डाटा जुळवून बघणे. त्यानंतर कंट्रोल युनीट, बॅलेट युनीट आणि व्हीव्हीपॅट सील करून स्ट्राँग रुममध्ये ठेवण्यात येते. प्रत्यक्ष मतदानाच्या एक दिवस अगोदर मतदान पथकाला मशीनचे वाटप केले जाते.
यावेळी चंद्रपूरचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संजय पवार, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार विजय पवार, सीमा गजभिये, रविंद्र भेलावे आदी उपस्थित होते.

# पुलगावचे माजी नगराध्यक्ष मनिष साहू मध्य नागपूरचे निरीक्षक



**पुलगाव । प्रतिनिधी**
अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने पुलगावचे माजी नगराध्यक्ष मनिषकुमार साहू यांची आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मध्य नागपूर विभागाच्या निरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या पदावर निवड झाल्याबद्दल मनिष साहू यांनी महाराष्ट्र काँग्रेस उपाध्यक्षा चारुलता टोकस आणि शेतकरी नेते शैलेश अग्रवाल यांचे आभार मानले आहेत.या नियुक्तीनंतर गजानन पचारे, अमित ददगल, निरज ढगे, अमर तिनघसे, सचिन बोबडे, भाऊलाल बरेठिया, प्रकाश शर्मा, निरज तिवारी आदी कार्यकर्त्यांनी मनिष साहू यांचे अभिनंदन केले.

# विकासाच्या बाबतीत भेजगाव ठरणार आदर्श गाव ना.श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला विश्वास





**मूल । प्रतिनिधी**

मतदारसंघातील प्रत्येक गावात विकासगंगा पोहचली आहे. भेजगावमध्ये अनेक विकासकामे मार्गी लावली आहेत. भेजगाव, डोंगरहळदी, चिंचाळासारखी गावे विकासाच्या बाबतीत महाराष्ट्रात आदर्श व्हावीत या दृष्टीने कामे करण्यात येत आहे. लवकरच हे स्वप्न पूर्ण झालेले असेल, असा विश्वास राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

भाजपा पदाधिकारी मेळाव्याला संबोधित करतांना ते बोलत होते. 'गावातील रस्ते, नाली, ग्रामपंचायत इमारत, विजेची व्यवस्था, स्मशानभूमी, सिंचन व्यवस्था, मनरेगामधून गोडाऊन बांधकाम, प्रशिक्षणासाठी सामाजिक सभागृह, वाचनालये तसेच जे शक्य आहे ते करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. भेजगावाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे,' असेही ना. श्री. मुनगंटीवार म्हणाले.

ना.मुनगंटीवार म्हणाले, 'भेजगावशी माझं प्रेमाचं नातं राहिलेलं आहे. जो शब्द दिला तो पूर्ण केला. विधानसभेमध्ये लोकांच्या प्रश्नासाठी कायम संघर्ष करीत आलो आहे. कष्टकरी शेतकऱ्याला धानाचा हेक्टरी २० हजार रुपये बोनस मिळवून दिला. भविष्यात गावाची प्रगती व्हावी यासाठी उमा-अंधारी नदीवर बंधारे बांधण्याचा मानस आहे. पाईपलाईनच्या माध्यमातून आसोलामेंढा, गोसेखुर्दचे पाणी या भागात आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. चिंचाळा, पाचगावात पाण्याची पाईपलाईन देत सिंचनाची योजना पूर्ण केली. जेवढी कामे या परिसरात शिल्लक राहिली असेल, ती येत्या काळात प्राधान्याने पूर्ण करेल.'

**संपर्क अभियानातून सुटतील समस्या**

गाव संपर्क अभियान राबवून प्रत्येक गावात शासकीय योजना पोहोचविण्यात येईल. सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी दर तीन महिन्यांनी बैठक घेण्यात येईल. भेजगावचा विकास हे ध्येय असून विकासाच्या बाबतीत भेजगाव हे महाराष्ट्रात मॉडेल व्हावे, यादृष्टीने काम करण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या प्रगतीसह सर्वसामान्यांची सेवा करण्याचा संकल्प केला असल्याचे ना. मुनगंटीवार म्हणाले.

## डॉ.अभिलाषा गावतुरे यांना निवडून आणण्यासाठी ओबीसी सेवा संघाचा निर्धार-इंजि.प्रदीप ढोबळे



**मूल । प्रतिनिधी**

डॉ. अभिलाषा गावतुरे या केवळ उमेदवार नसून फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांचा विजय म्हणजे महापुरुषांनी चालवलेल्या आंदोलनाची फलश्रुती ठरेल, असे प्रतिपादन ओबीसी सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष आणि कायदेतज्ज्ञ इंजि. प्रदीप ढोबळे यांनी केले.

यंग रेस्टॉरंट येथे डॉ. अभिलाषा गावतुरे यांच्या समर्थनार्थ ४० पुरोगामी संघटनांच्या चिंतन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ढोबळे बोलत होते. त्यांनी सांगितले की, अभिलाषा यांची लढाई ही धनशक्ती विरुद्ध जनशक्ती आहे. दलित, आदिवासी, ओबीसी, शेतकरी आणि मजूर वर्ग एकत्र आल्यास विचारधारेशी प्रामाणिक राहून धनशक्तीचा पराभव करता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या चिंतन बैठकीस ज्येष्ठ पुरोगामी विचारवंत हिरांचद बोरकुटे, भूमिपुत्र ब्रिगेडचे मार्गदर्शक डॉ. राकेश गावतुरे, ओबीसी सेवा संघाचे विलास माथणकर, अखिल भारतीय माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. सचिन भेदे तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## अनवाणी विद्यार्थ्यांना दिलासा

# वसुंधरा फाऊंडेशन व वैश्विक विकास संस्थेचा आदिवासी विद्यार्थ्यांसाठी चप्पल वितरण उपक्रम





**उमरखेड । प्रतिनिधी**

मेळघाटातील दुर्गम भागात शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसुंधरा फाऊंडेशन आणि वैश्विक विकास संस्था, मुलावा यांनी एक अनोखा उपक्रम राबवला आहे. गरिबीत जीवन जगणाऱ्या या विद्यार्थ्यांना अनवाणी शाळेत जाण्याची वेळ येते. त्यांच्या पायांचे आरोग्य आणि शिक्षणातला उत्साह अबाधित ठेवण्यासाठी या दोन्ही संस्थांनी पुढाकार घेऊन चप्पल वितरण उपक्रम राबवला, जो समाजात प्रेरणादायी ठरत आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आदिवासी भागात जिथे साधारण सोयीसुविधा देखील मिळणे कठीण आहे, तिथे साध्या चप्पलची कमतरता असते. कधी गरिबी, तर कधी दुर्लक्ष यामुळे मेळघाटातील अनेक विद्यार्थी अनवाणी पायाने शाळेत येतात. या पार्श्वभूमीवर, वसुंधरा फाऊंडेशन आणि वैश्विक विकास संस्था यांनी पुढाकार घेऊन या विद्यार्थ्यांसाठी गरजेच्या चपला भेट दिल्या आहेत. यामुळे मुलांचे पाय सुरक्षित राहतील, त्यांना शिक्षणात अडथळे येणार नाहीत, आणि त्यांच्यातील आत्मविश्वास वाढेल.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, आम्ही या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या वाटचालीत कुठेही कमी पडू देणार नाही. त्यांच्या भविष्यासाठी हे छोटेसे योगदान खूप महत्त्वाचे आहे. अनवाणी पायाने शिक्षणाच्या वाटेवर जाऊ नयेत, हीच या उपक्रमामागील प्रमुख भावना आहे.

यात विशेष म्हणजे, खारीचा वाटा उचलण्याची भावना ठेवत या संस्थांनी केवळ एक सामाजिक उपक्रम राबवला नाही तर आदिवासी समाजाप्रती असलेले आपले बांधिलकी देखील प्रदर्शित केली. वसुंधरा फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष जाऊन प्रत्येक विद्यार्थ्याला चप्पल देऊन त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवले.

यामुळे मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद व समाधान त्यांच्या पालकांपर्यंत पोहोचले, जे त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने अत्यंत सकारात्मक आहे. या उपक्रमातून स्थानिक समाजात आदिवासी विद्यार्थ्यांप्रती सहानुभूती आणि जागरूकता निर्माण झाली आहे.वसुंधरा फाऊंडेशन आणि वैश्विक विकास संस्थेच्या या उपक्रमामुळे मेळघाटातील आदिवासी समाजात चांगलेच कौतुकाचे वातावरण निर्माण झाले आहे, आणि इतरही संस्था अशा उपक्रमांत सहभागी होण्यासाठी प्रेरणा घेत आहेत.

## आमच्या कुटुंबाला वेठीस धरायचं आहे का?

# समाज यांना माफ करणार नाही-आमदार अशोक पवार

**घटना अत्यंत वेदनादायक**

**अशोक पवार यांनी या दुर्दैवी घटनेवर दुःख व्यक्त केले असून, विरोधकांवर टीका करताना त्यांनी समाजातील घटनेचे गांभीर्य समोर आणले. माझ्या मुलाला प्रचाराच्या नावाखाली मोटारसायकलवर नेऊन एका जवळच्या वस्तीत कोंडून त्याला विवस्त्र करण्यास भाग पाडले गेले, असे त्यांनी सांगितले. पवार म्हणाले, हे लोक कुठल्या थराला जाणार आहेत? समाजाशी एकरूप राहण्याच्या आमच्या प्रयत्नांना हादरा देण्याचा हा घृणास्पद प्रकार आहे.**

**राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अमोल कोल्हे यांनीही या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. लोकप्रतिनिधीच्या मुलाचे अपहरण होऊन त्याला विवस्त्र करून ब्लॅकमेल करणारी ही घटना महाराष्ट्रातील कायदा-सुव्यवस्थेचे धिंडवडे काढणारी आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा यामध्ये अपयश ठरले आहे, असे अमोल कोल्हे यांनी सांगितले.**

**काळ या घटनेला माफ करणार नाही**

**अशोक पवार यांनी या घटनेच्या मागे असलेल्या सूत्रधारांचा शोध घेण्याची पोलिसांना विनंती केली आहे. आमच्या कुटुंबाला वेठीस धरायचं आहे का? समाज या गुंड प्रवृत्तीच्या लोकांना कधीच माफ करणार नाही,असे पवार यांनी ठामपणे सांगितले.**

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अशोक पवार यांच्या मुलावर झालेल्या अपहरण प्रकरणामुळे संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. अशोक पवार यांचे पुत्र ऋषिराज पवार याचे अपहरण करून त्याचा विवस्त्र फोटो महिलेसोबत काढण्यात आला व त्याला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. ऋषिराज पवार यांनी याबाबत शिरूर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली असून, या घटनेवर आमदार अशोक पवार यांनी सोशल मीडियावर आपली प्रतिक्रिया नोंदवली आहे. या प्रकरणामुळे महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात खळबळ माजली असून पोलिसांनी या घटनेची कसून चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.



## कोल्हे कुटुंबाचे योगदान उल्लेखनीय-गिरीश महाजन



**कोपरगाव । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत कोपरगाव मतदारसंघात पक्षाच्या हितासाठी भूमिका घेतलेल्या कोल्हे कुटुंबाचे उल्लेखनीय योगदान आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी केले. दीपावली फराळानिमित्त कोल्हे निवासस्थानी झालेल्या भेटीत त्यांनी भाजपा कार्यकर्त्यांशी संवाद साधला आणि कोल्हे कुटुंबाच्या निष्ठेबद्दल गौरवोद्गार काढले.

महाजन म्हणाले की, वाघ जेव्हा मोठी झेप घेतो, तेव्हा दोन पावले मागे येतो, या धोरणाने कोल्हे कुटुंब कार्यरत आहे. कोल्हे कुटुंबाच्या या निष्ठेने पक्षाला भविष्यात मोठा आधार मिळणार आहे. स्व. शंकरराव कोल्हे यांच्या शेतकरी आणि पाण्यासाठीच्या कार्याची आठवण करून देत, महाजन यांनी त्यांच्या योजनेसाठी कोल्हे कुटुंबाने आजही आग्रही असल्याचे नमूद केले.

यावेळी गुजरातचे माजी विधानसभा अध्यक्ष राजेंद्र त्रिवेदी, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, सहकार महर्षी कारखाना अध्यक्ष विवेकभैय्या कोल्हे, तसेच भाजपा आणि कोल्हे कुटुंबाचे अनेक सदस्य आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# चिमूर विधानसभा निवडणुकीत वारजुकर यांना मनोज मडावी यांचे समर्थन-निवडणुकीत मोठी आघाडी घेण्याची शक्यता

**चिमूर । शेषराव राऊत**

चिमूर विधानसभा क्षेत्रात आगामी निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर सतीश वारजुकर यांच्या पाठिशी आदिवासी नेते मनोज मडावी उभे राहिल्याने त्यांचे पारडे जड झाले आहे. मडावी यांच्या समर्थनामुळे वारजुकर यांना ५० ते ६० हजार मताधिक्याने विजय मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मागील निवडणुकांमध्ये काँग्रेसला मिळालेल्या मोठ्या पाठिंब्यानंतर, स्थानिकांचा वाढता रोष, शेतकऱ्यांची नाराजी, आणि अन्यायग्रस्त आदिवासी समाजाचे प्रश्न यामुळे वारजुकर यांना क्षेत्रात वाढते सहकार्य मिळत आहे. याशिवाय, विकास कामांच्या अभावामुळे आणि सत्ताधारी आमदारांच्या वागणुकीमुळे मतदारांमध्ये असंतोष पसरला आहे.मनोज मडावी यांनी समाजाच्या हितासाठी महाविकास आघाडीला पाठिंबा जाहीर करून, आदिवासी समाजाच्या समस्यांना न्याय मिळवून देण्याची आपली भूमिका स्पष्ट केली आहे. तसेच, कुणबी समाजाचे महायुतीकडून होणारे अपमानकारक वक्तव्यही मतांमध्ये फटका देण्याची शक्यता आहे.चिमूर क्षेत्रातील असमाधान, बेरोजगारी, आणि विकासाची कमतरता यामुळे महायुती सरकारविरोधी वातावरण तयार झाले आहे. विद्यमान आमदार बंटी बांगडिया यांना रोषाचा सामना करावा लागणार असून, दहा वर्षे सत्तेत असूनही अपेक्षित विकास साध्य करण्यात आले नाही अशी टीका जनतेतून केली जात आहे.शेतकऱ्यांचे आर्थिक संकट, पिकांच्या किंमतीतील घसरण, आणि मदतीच्या अभावामुळे शेतकरी वर्ग सरकारविरोधात नाराज आहे. परिणामी, महायुतीच्या शेतकरीविरोधी धोरणाला यावेळी फटका बसण्याची शक्यता आहे.या सगळ्या पार्श्वभूमीवर, चिमूर विधानसभा क्षेत्रात महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर सतीश वारजुकर यांना जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून, धनशक्ती विरुद्ध जनशक्तीचा हा सामना आहे. २३ नोव्हेंबरला या निवडणुकीचा निकाल स्पष्ट होणार असून, सध्या तरी वारजुकर यांच्या विजयाची शक्यता मजबूत दिसून येत आहे.



# महाविकास आघाडी हाच शेतकऱ्यांसाठी खरा आधार–शरद पवार यांचे प्रतिपादन

**शेवगाव । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना सध्याच्या संकटातून बाहेर काढण्यासाठी महाविकास आघाडी हाच एकमेव ठोस पर्याय आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केले. अँड. प्रताप ढाकणे यांच्या प्रचारार्थ शेवगाव येथे आयोजित जाहीर सभेत बोलताना त्यांनी मतदारांना महाविकास आघाडीला पाठिंबा देण्याचे आवाहन केले.

शरद पवार म्हणाले, आज शेतकरी अनेक समस्यांचा सामना करत आहे. या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार सक्षम आहेत, जे समाजाच्या गरजा ओळखून कार्य करतील. शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातील अँड. प्रताप ढाकणे यांच्या कामाची प्रशंसा करत पवार यांनी त्यांना प्रामाणिक नेता म्हणून गौरवले.

सभेत खासदार निलेश लंके यांनीही प्रताप ढाकणे यांना जोरदार पाठिंबा दिला. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले, अँड. प्रताप ढाकणे हा येथे उपस्थित प्रत्येक व्यक्तीचा आवाज आहे. त्यांच्या विजयानंतर आपल्यासारख्या सर्वसामान्य लोकांचा प्रतिनिधी विधिमंडळात पोहोचेल. लंके यांनी मतदारांना मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन केले.

सभेदरम्यान ऋषिकेश ढाकणे, प्रभावती ढाकणे, आणि कराळे मास्तर यांनी महाविकास आघाडीत प्रवेश केला, ज्यामुळे आघाडीला बळकटी प्राप्त झाली आहे. यामुळे कार्यकर्त्यांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.शेवगाव व पाथर्डी येथील शेतकऱ्यांच्या समस्यांवर चर्चा करताना शरद पवार यांनी स्थानिक नेतृत्वाच्या महत्त्वावर भर दिला. महाविकास आघाडीच्या माध्यमातून हा मतदारसंघ शेतकरी, कामगार आणि युवकांसाठी योग्य नेतृत्व निवडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.




# यश दगडू तोडमल या खेळाडूने पटकावले ब्राँझ पदक

**राहुरी । सत्यम भोसले**




मुंबई मधील विरार येथे दि. ९ नोव्हेंबर २०२४ रोजी ११ ते १४ वयोगटातील पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य स्टेट लेव्हल रोलर स्केटिंग काँम्युटिशन स्पर्धेत राहुरी तालुक्यातील गोटुंबे आखाडा येथील रहिवासी असलेला व मौर्य अकॅडमी इंग्लिश मिडीयम स्कूल राहुरी येथे इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेत असलेला यश दगडू तोडमल या विद्यार्थ्याने तिसरा क्रमांक पटकावत ब्राँझ पदक मिळविले आहे,तसेच या सुमार कामगिरीच्या बळावर यश दगडू तोडमल या खेळाडूची मैसुर येथे होणाऱ्या नँशनल लेव्हल साठी निवड झाली असून त्याची निवड झाल्याबद्दल यश यास आरटीएसए स्केटिंगचे प्रशिक्षक ऋषिकेश तारडे आणि त्यांचे सहकारी सुनिल पाले सर यांचें यशचे पालक दगडू तोडमल यांनी त्यांचे आभार मानले आहे.

तसेच यशच्या कामगिरी बद्दल मौर्य अकॅडमी इंग्लिश मिडीयम स्कूलमधील प्राचार्य व शिक्षक वर्ग तसेच राहुरी खुर्दच्या सरपंच मालतीताई साखरेचे व माजी सरपंच सचिन शेटे, माजी उप सरपंच उमेश बाचकर, माजी ग्रामपंचायत सदस्य, बिरु ठोंबरे, पत्रकार रमेश खेमनर यांच्यासह अनेकांकडून यशच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

# महायुतीचे सरकारच खरे जनतेचे–राधाकृष्ण विखे पाटील यांचा महाविकास आघाडीवर हल्लाबोल

**राहुरी । सत्यम भोसले**


राज्यात निवडणुकीचे वातावरण तापले असून, महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर महायुतीचे नेते आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली आहे. शिर्डी विधानसभा मतदारसंघातील चंद्रापूर, हसनापूर, आणि दुर्गापूर येथे मतदारांशी संवाद साधताना विखे पाटील म्हणाले की, महाविकास आघाडीचा पंचसूत्री कार्यक्रम फसवा आहे. लोकसभा निवडणुकीच्यावेळी खटाखट पैसे देण्याचे आश्वासन देणाऱ्यांनी अद्याप एक रुपयाही दिला नाही.



विखे पाटील यांनी महायुती सरकारच्या विविध योजनांचा उल्लेख करत जनतेला दिलेला आधार स्पष्ट केला. त्यांनी 'लाडकी बहीण योजना', 'एसटी सवलत', 'नमो शेतकरी सन्मान योजना', 'दुध अनुदान', आणि 'वयोश्री योजना' यांसारख्या योजनांचा उल्लेख केला आणि सांगितले की, महायुती सरकारने सर्वसामान्यांसाठी ठोस मदत दिली आहे.

ते म्हणाले, महाविकास आघाडी 'लाडकी बहीण योजना' फसवी असल्याचे म्हणते, तर मग या योजनेसाठी जास्तीची रकमेचे आश्वासन महिलांना कसे देतात? विखे पाटील यांनी महाविकास आघाडीवर ताशेरे ओढत सांगितले की, जनतेच्या मनात महायुतीचे सरकार आहे, आणि भविष्यातही हेच सरकार सामान्य माणसाच्या पाठबळावर सत्तेवर येईल.शिर्डी मतदारसंघात आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि पाचशे एकरांमध्ये औद्योगिक वसाहतीची योजना असल्याने भविष्यात रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होणार असल्याचेही विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

# शिर्डी मतदारसंघात प्रभावती घोगरे यांच्या प्रचारार्थ शरद पवारांची सभा,विखे घराण्याशी संघर्षावर लक्ष



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीच्या शिर्डी मतदारसंघातील उमेदवार प्रभावती ताई घोगरे यांच्या प्रचारार्थ १३ नोव्हेंबर २०२४ रोजी ज्येष्ठ नेते खासदार शरदचंद्र पवार यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेत पवार काय भूमिका मांडतील याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

शरद पवार आणि विखे घराण्याचे दीर्घकाळ चालत आलेले राजकीय वैर महाराष्ट्राला नवीन नाही. खासदार डॉ. सुजय विखे यांच्या पराभवासाठी पवारांनी पूर्वीही आपली संपूर्ण ताकद लावली होती. आता विखे घराण्याच्या बालेकिल्ल्यात पवार काय म्हणतात, याकडे संपूर्ण मतदारसंघ आणि राज्याचे लक्ष केंद्रित झाले आहे.

# शिर्डीच्या विकासास समर्थन कैलास कोते यांचा महाविकास आघाडीवर हल्लाबोल



**शिर्डी । प्रतिनिधी**

शिर्डी मतदारसंघाच्या विकासासाठी नेहमीच जातीधर्माच्या पलीकडे जाऊन निधी उपलब्ध करून दिला आहे, असे म्हणत माजी नगराध्यक्ष कैलास कोते यांनी विरोधकांना दहशतीच्या आरोपांवर प्रत्युत्तर दिले. त्यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात नमूद केले की, वर्षानुवर्षे या भागातील विकास अविरतपणे सुरू आहे, आणि शिर्डीचा चेहरा मोहरा ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने बदलत आहे.

कोते यांनी महाविकास आघाडीवर आरोप करत सांगितले की, केवळ निवडणुकीच्या राजकारणासाठी बाहेरून येणाऱ्या नेत्यांनी शिर्डीच्या विकास प्रक्रियेत अडथळे निर्माण करू नयेत. आज ज्या व्यक्ती मत मागायला येतात, त्या संकटाच्या वेळी इथे नसतात. दहशतीच्या आरोपांद्वारे विरोधक शिर्डीला बदनाम करण्याचे षड्यंत्र रचत आहेत, जे आम्ही सहन करणार नाही.

विखे पाटील यांच्या पुढाकारातून शिर्डीत औद्योगिक वसाहत, थिमपार्क, आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या उभारणीची कामे सुरू असल्याचे कोते यांनी सांगितले. ते म्हणाले, कोणतेही संकट आले तरी विखे पाटील नेहमीच या भागातील जनतेच्या पाठीशी उभे राहतात. त्यांच्या विकास कामांमुळे आणि राज्याच्या राजकारणात वाढत्या वर्चस्वामुळे विरोधकांच्या डोळ्यात खुपते आहे.शिर्डीच्या विकासासाठी स्थिर राहण्याचा आणि निरर्थक प्रचाराला बळी न पडण्याचा विश्वास व्यक्त करत, शिर्डी मतदारसंघातील जनतेने या आरोपांचा निषेध करावा, असे आवाहन कोते यांनी केले.

# कोपरगाव विधानसभा निवडणुकीत उत्साहाचा माहोल, उमेदवारांच्या गाड्यांनी गावागावांत धुराळा






**कोपरगाव । प्रतिनिधी**

विधानसभेची निवडणूक अवघ्या आठ-नऊ दिवसांवर येऊन ठेपल्याने कोपरगाव मतदारसंघात उमेदवारांनी प्रचाराच्या गतीत वेग आणला आहे. निवडणुकीत बाराही उमेदवारांच्या प्रचारमुळे गावागावांत धुराळा उडत असून, मतदारसंघात प्रत्येक उमेदवाराला जणू आमदार झाल्याचा अनुभव येत आहे. महायुतीकडून विद्यमान आमदार आशुतोष काळे तर महाविकास आघाडीकडून संदीप वर्पे मुख्य लढतीत आहेत.

आशुतोष काळे भारतीय जनता पार्टी आणि शिंदे गटासह महायुतीच्या नावाने मतदारांपर्यंत पोहोचत आहेत. त्यांच्या प्रचारात माजी आमदार स्नेहलता कोल्हे, विवेक कोल्हे, विखे गट, आणि नितीन औताडे यांचा मोठा सहभाग आहे.

दुसरीकडे, महाविकास आघाडीचे संदीप वर्पे हे शरद पवार समर्थक, उद्धव ठाकरे समर्थक, काँग्रेस कार्यकर्त्यांच्या सोबतीने प्रचारात व्यस्त आहेत.अन्य अपक्ष उमेदवारांमध्ये बळीराजा पार्टीचे शिवाजी कवडे पिपाणी वाजवत गावोगावी मतदारांना आवाहन करताना दिसत आहेत, तर सामाजिक कार्यकर्ते संजय काळे मतदारांसमोर प्रलंबित प्रश्नांची यादी सादर करत आहेत. मात्र, प्रचाराची गती सर्वांमध्ये एकसमान नसून काही उमेदवार अजूनही मतदारसंघातील बहुतांशी गावांमध्ये पोहोचलेले नाहीत.

सहज हौसेखातर उमेदवारी करणारे, तसेच अन्य उद्देशांसाठी निवडणुकीत उतरलेले उमेदवारही यंदा आहेत, त्यामुळे निकाल लागेपर्यंत प्रत्येक उमेदवाराला आमदार झाल्याचा आनंद अनुभवायला मिळणार असल्याचे चित्र आहे.

# लोकशाहीचा खरा राजा मत पेटीतूनच जन्मतो–अॅड.नितीन पोळ

**कोपरगाव । प्रतिनिधी**

लोकशाहीचा राजा राणीच्या पोटातून नाही, तर मत पेटीतून जन्माला येतो, अशी सोपी आणि स्पष्ट व्याख्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला राज्य घटना देताना मांडली होती, असे ड. नितीन पोळ यांनी सांगितले. कोपरगावात आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते.

पोळ म्हणाले की, या देशात राष्ट्रपतीपासून सर्वसामान्य मतदारपर्यंत प्रत्येक मताचे मोल सारखे आहे. मात्र, आज राजकीय नेत्यांनी अशी परिस्थिती निर्माण केली आहे की, लोक विसरून गेले आहेत की ते स्वतःचे प्रतिनिधी निवडू शकतात. जनतेच्या पैशावर उभ्या केलेल्या संस्था, बँका, साखर कारखाने, दूध संघ, आणि शिक्षण संस्थांवर




काही नेत्यांनी कब्जा केला असून, त्यांनी कोट्यवधींचा मालामाल झाला आहे. त्यातून संपत्ती, सत्ता, आणि त्या सत्तेचा माज निर्माण झाला आहे.


पोळ पुढे म्हणाले, सत्तेच्या जोरावर निवडणुका जिंकण्यासाठी पैशांचा वापर होत असून, अधिकार्यांपासून माध्यमांपर्यंत, अगदी मतदारही विकत घेतले जातात. विरोध सहन होत नसल्याने प्रस्थापित नेत्यांचे कार्यकर्ते विरोधकांवर तुटून पडतात. सत्तेच्या आणि पैशाच्या जोरावर सामान्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे.तरीसुद्धा, गुप्त मतदानाच्या माध्यमातून मतदारांना स्वतःची मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यामुळे मतदारांनी निर्भय होऊन, कोणत्याही प्रकारच्या दबावाला न जुमानता, आपला हक्क बजावावा आणि प्रस्थापितांना घरचा रस्ता दाखवावा, असे आवाहन ड. नितीन पोळ यांनी केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# हावरट 'दिदी'चा कारनामा! भावी नवऱ्याचे पॅकेज ३० लाखऐवजी ३ लाख समजल्यावर केला घोर अपमान सोशल मीडीयावर व्हायरल


## कळताच मुलीचा तिळपापड; शिवीगाळ करत मोडलं लग्न, Whatsapp चॅट व्हायरल












**व्हायरल । प्रशांत कुंडकर**

सध्याच्या काळात अनेकजण हे लग्नासाठी मॅट्रोमोनिअल साईट्सवर आपला जोडीदार शोधतात. या ठिकाणी आपल्या प्रोफाईलला मिळता जुळता किंवा आपल्या आवडी-निवडीनुसार जोडीदार दिसल्यास संपर्क करुन पुढील चर्चा सुरू केली जाते.

नुकतेच एका पुरुष आणि महिलेचा एकमेकांसोबबत मॅट्रोमोनिअल साईटवरुन संपर्क झाला आणि त्यानंतर त्यांच्यात व्हॉट्सअप चॅटिंग सुद्धा सुरू झाली. मात्र, याच दरम्यान जेव्हा या महिलेला समोरच्या पुरुषाच्या पगाराबाबत कळले तेव्हा ती चांगलीच संतापली आणि तिने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. या दोघांमधील व्हॉट्सअप चॅट सोशल मीडियात जोरदार व्हायरल होत आहे.

मॅट्रोमोनिअल साईटवरुन अनेकजण लग्नासाठी जोडीदार शोधत असतात. जेव्हा या जोडीदारांमध्ये काही बिनसतं आणि जुळून येत नाही तेव्हा त्यांच्यात झालेल्या चॅटिंगचे फोटोज सोशल मीडियात समोर येतात. अशीच एक पोस् सध्या इंटरनेटवर चर्चेचा विषय बनली आहे. ज्यामध्ये पुरुषाने आपला पगार सांगितल्यावर मुलीचा चांगलाच तिळपापड होतो.

नेमकं काय घडलं?

सोशल मीडियात व्हायरल होणाऱ्या व्हॉट्सअप चॅटमध्ये पुरुष आणि महिला यांच्यात नेमकं काय संभाषण झाले हे दिसत आहे. या महिलेने विचारले की, पप्पा विचारतायत की साखरपुडा कधी करायचा? पुरुषाने उत्तर लिहिले की, आपल्याला एकमेकांना समजून घेण्यासाठी आणखी थोडा वेळ हवा आहे. आपल्या दोघांचेही हे दुसरे लग्न आहे.

यानंतर महिलेने पुढे लिहिले की, मी जास्त वेळ वाट नाही पाहू शकत.. की दुसऱ्यासोबत बोलू? तुम्हाला जे काही बोलायचं आहे ते आत्ता बोला. यानंतर पुरुषाने म्हटले की, बरं सांग तुला साखरपुडा कधी करायचा आहे? यावर महिलेने सांगितले की, नोव्हेंबर महिन्याच्या आसपास... यावर पुरुषाने सहमती दर्शवली. पण पुढे म्हटलं, माझ्या प्रोफाईलमध्ये एक छोटी चूक झाली आहे.

महिलेने म्हटले की, रविवारी भेटू मग पुढे चर्चा करू. तसेच प्रोफाईलमध्ये काय चूक आहे? असं विचारलं. यावर त्या पुरुषाने उत्तर दिले की, माझ्या प्रोफाईलमध्ये वर्षाचा पगार ३० लाख रुपये लिहिला आहे. पण प्रत्यक्षात माझा पगार वर्षाला ३ लाख रुपये आहे. यावर महिलेने कोणतेही उत्तर दिले नाही. मग पुरुषाने मेसेज केला की, रविवारी भेटू आणि मग चर्चा करू. हे वाचून ही महिला चांगलीच संतप्त झाली आणि शिवीगाळ सुरू केली.

एक्सवर पोस्ट

एक्सवर घळीहुरीडळषष ने या चॅटिंगचे स्क्रीनशॉट शेअर केले आहेत आणि लिहिलं, जोपर्यंत मी माझी टायपिंग मिस्टेक झाल्याचं सांगितलं नव्हतं तोपर्यंत ती चांगली होती. या पोस्टला आतापर्यंत लाखोंच्या संख्येत व्ह्यूव्ज मिळाले असून हजारोंच्या संख्येत लाईक्स आणि कमेंट्सचा पाऊस पडल्याचं पहायला मिळत आहेत. या व्हायरल पोस्टवर नेटिझन्सकडून विविध प्रतिक्रिया येत आहेत.

जगासमोर हावरट दिदींचं पितळ उघडं पडलं.. नेमकं घडलं तरी काय?

पहिलं लग्न अयशस्वी ठरल्यानंतर एका तरुण-तरुणीला दुसऱ्यांदा लग्न करायचं होतं. हे दोघेही आपल्या जोडीदारापासून वेगळे झाले आहेत. या दोघांच्याही व्हायरल झालेल्या चॅटमध्ये ते दोघं गप्पा मारत असताना, प्रथम महिला पुरुषाला लवकरात लवकर लग्न करण्यास सांगते, तर त्या पुरुषाला एकमेकांना जाणून घेण्यासाठी जास्त वेळ हवा असतो. तर यावर महिलेचे म्हणणे आहे की जर काही विलंब झाला तर दुसरा जोडीदार शोधू.. असंच बोलता बोलता पुरूष म्हणतो की, मला एक गोष्ट सांगायची आहे, ती म्हणजे, सॉरी.. माझा पगार ३० रुपये नाही तर ३ लाख रुपये आहे. मॅट्रिमोनिअल साइटच्या प्रोफाईलमध्ये टायपिंगची चूक झाल्याचे त्याने सांगितले. आणि जशी ही गोष्ट महिलेला समजली, तसे तिने त्या पुरुषाला शिव्यांची लाखोली वाहिली, आणि त्याचा अपमान करायला सुरूवात केली.

महिला आणि तिच्या आईची पुरूषाला धमकी

पीडित पुरुषाने सांगितले की, ती महिला त्याच्याशी सुरूवातील छान बोलली. पण पगार ३० रुपये नाही तर ३ लाख रुपये असल्याचे सांगत मॅट्रिमोनिअल साइटच्या प्रोफाईलमध्ये टायपिंगची चूक झाल्याचे सांगितले. यानंतर महिलेने अपशब्द वापरण्यास सुरुवात केली. नंतर महिलेच्या आईनेही त्या पुरुषाला खूप धमक्या दिल्या. ही चॅट किश सिफ नावाच्या सोशल मीडिया प्रोफाइलवरून शेअर करण्यात आली आहे. त्याच्या बायोमध्ये, तो सेव्ह इंडियन फॅमिली फाऊंडेशनचा समुपदेशक असल्याचं म्हटलं आहे, जी पुरुषांच्या हक्कांसाठी काम करणारी एक छत्र्ञ्ज आहे.

नेटकऱ्यांकडून कडाडून प्रतिक्रिया, महिलेला हावरट म्हटलं

दुसऱ्या पोस्टमध्ये, त्या व्यक्तीने सांगितले आहे की, त्याला कळले की त्या महिलेने नुकताच तिच्या पतीला घटस्फोट दिला आहे. आणि तिने तिच्या माजी पतीकडून भरपाई म्हणून चांगली रक्कम घेतली आहे. महिलेने तिच्या सासरच्यांविरुद्ध खोटा गुन्हा दाखल केला आणि तडजोडीच्या नावाखाली ८० लाख रुपये घेतल्याचा त्या व्यक्तीचा दावा आहे. तर संभाषणात ती म्हणायची की, तिने तिच्या पतीकडून एक पैसाही घेतला नाही. या पोस्टवर कमेंट करणारे अनेक लोक महिलेला पैशाचा लोभी म्हणत आहेत. ती महिलेली हावरट म्हटलंय.. म्हणे बाकी काही नाही.

# अजित पवार गटाच्या माजी उपसरपंचाकडून मावळात ३६ लाखाची रोकड जप्त



**पुणे मावळ । मनोज उतेकर**

मावळ विधानसभा मतदार संघातील अजित पवार गटाच्या माजी उपसरपंचाकडून ३६ लाखाची रोकड जप्त करण्यात आली आहे. तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्याच्या भरारी पथकाने माजी उपसरपंचाच्या कार्यालयावर छापा टाकून रविवारी (१० नोव्हेंबर) ३६ लाख ९० हजार ५०० हजारांची रोकड जप्त केली आहे.

सध्या निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने विधानसभा मतदारसंघांमध्ये विविध ठिकाणी पथकांकडून तपासणी केली जात आहे.

सचिन शाबू मुर्हे (रा. सोमाटणे, चौराईनगर) असे रोकड जप्त केलेल्या माजी उपसरपंचाचे नाव आहे. तर सचिन मुऱ्हे यांची पत्नी धनश्री सचिन मुऱ्हे माजी ग्रामपंचायत सदस्य आहेत. तसेच आमदार सुनील शेळके यांच्या पत्नीने सुरू केलेल्या कुलस्वामिनी महिला बचत गटाच्या त्या सदस्या आहेत.

पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी याबाबत माहिती दिली. मुर्हे यांचा जमीन खरेदी-विक्री आणि स्टीलचा व्यवसाय आहे. त्यांच्या पत्नी तीन वर्षापूर्वी ग्रामपंचायत सदस्या होत्या. तळेगाव दाभाडे पोलिसांना सोमाटणे येथे मुर्हे यांच्या कार्यालयात मोठी रोकड असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार, तळेगाव पोलीस आणि भरारी पथकामार्फत मुर्हे यांच्या कार्यालयावर छापा टाकण्यात आला. या कारवाईत कार्यालयात ३६ लाख ९० हजार ५०० रूपयांची रोकड आढळून आली.

मुर्हे यांना रकमेबाबत समाधानकारक उत्तर देता न आल्याने रोकड जप्त करण्यात आली. याबाबत निवडणूक विभाग आणि आयकर विभागाला कळविण्यात आले आहे. जप्त केलेली रक्कम आयकर विभागाकडे हस्तांतरित केली आहे, अशी माहिती उपयुक्त गायकवाड यांनी दिली.

# ज्यांनी सहकार जपला नाही,ते आता निवडणूक लढवायला निघालेत'-आ.पंकज भोयर

**वर्धा । प्रतिनिधी**

भाजपा महायुतीचे उमेदवार आणि आमदार डॉ. पंकज भोयर यांनी वर्ध्यातील निवडणूक प्रचार सभेत विरोधकांवर गंभीर आरोप करताना सहकार क्षेत्रातील अपयशावर प्रकाश टाकला. त्यांनी म्हणाले, ज्यांनी वर्ध्यातील दोन सूतगिरण्या, कृषी उत्पन्न बाजार समिती आणि जिल्हा मध्यवर्ती बँकेसारख्या महत्त्वाच्या संस्थांचे चांगले व्यवस्थापन केले नाही, तेच आता निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. सभेला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, माजी खासदार रामदास तडस, सागर मेघे, सुरेश वाघमारे व इतर भाजपाचे नेतेही उपस्थित होते. आ. भोयर यांनी सहकार क्षेत्रातील दिग्गज नेते बापूराव देशमुख आणि प्रमोद शेंडे यांच्या योगदानाचे कौतुक केले, पण त्यांची पुढील पिढी संस्थांचे व्यवस्थापन नीट न राखल्याचा आरोप केला. त्यांनी म्हटले की, दोन सूतगिरण्या भाड्याने दिल्या गेल्या, आणि भागधारकांना वाऱ्यावर सोडण्यात आले. जिल्हा मध्यवर्ती बँकही आर्थिक संकटात सापडली आणि शेतकऱ्यांना त्याचे दुष्परिणाम भोगावे लागले.



याशिवाय, सागर मेघे यांनी अपक्ष उमेदवार आणि त्यांच्या चुलत बंधूंवर अप्रत्यक्ष टिप्पणी करून त्यांना ठाम इशारा दिला. सभेच्या समाप्तीनंतर या दोन्ही वक्तव्यांवर परिसरात चर्चेला उधाण आले आहे, ज्यामुळे प्रचाराची रंगत अधिकच वाढली आहे.

# वर्ध्याचे पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांची करुणाश्रमाला भेट

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांनी आज करुणाश्रमला पारिवारिक भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी करुणाश्रमात जप्त केलेल्या गोवंशांचे निरीक्षण केले आणि त्यांच्या देखभालीसाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली.

जैन यांनी गोवंशांच्या योग्य पालनपोषणाबाबत संबंधित व्यक्तींशी संवाद साधला. त्यांनी गोवंशांना विविध गोशाळांमध्ये पाठवण्याच्या नियोजनाबाबत चर्चा केली. विशेष म्हणजे, जैन यांनी स्वतःच्या वर्ध्यातील निवासस्थानी देखील गोवंश पालन करण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

करुणाश्रम संस्थेने पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांच्या या संवेदनशील भेटीबद्दल आभार व्यक्त केले असून, त्यांच्या पुढील कार्यवाहीला पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले आहे.



# आमदार अशोक पवार यांच्या मुलाच्या प्रकरणात वाघोली कनेक्शन?

**शिरूर । प्रशांत कुंडकर**

आमदार अशोक पवार यांचे सुपुत्र व रावसाहेब पवार घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष ऋषीराज पवार (वय २६) यांचे अपहरण करून मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे.

ऋषीराज पवार यांनी व्हिडिओच्या माध्यमातून घडलेली घटना कथन केली आहे. या घटनेनंतर उलटसुलट चर्चा सुरू झाल्या होत्या. पण, या घटनेमध्ये तथ्य असून या प्रकरणात वाघोली कनेक्शन असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे.

शिरूर-हवेली विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीकडून अशोक पवार उभे राहिले आहेत. वडिलांसाठी ऋषीराज पवार हे मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथे प्रचार करीत होते. यावेळी एका टोळक्याने त्यांचे अपहरण केले व दहा कोटी रुपयांच्या खंडणीसाठी विवस्त्र करून मारहाण केली. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले आहे.

ऋषिराज पवार यांनी सांगितले की, भाऊ कोळपे हा दिवसभर आमच्या प्रचारात फिरला. मी त्याच्यावर विश्वास ठेवला, त्याला माझ्या गाडीत बसवले. आमची गाडी मांडवगण वडगाव पर्यंत नेली असता तिथून पुढं चारचाकी गाडी जाणार नाही असे कोळपे याने सांगितले. तिथं कोळपेच्या मित्रांच्या दोन दुचाकी आलेल्या होत्या. कच्च्या रस्त्यातून बंगल्यापर्यंत दुचाकी नेण्यात आल्या. बंगल्यात नेण्यात आलं, तिथं एकांतात चर्चा करायची आहे असं सांगत रुममध्ये बोलावण्यात आले. भाऊ कोळपे आणि त्यांच्या दोन मित्रांनी दरवाजा बंद केला. एक बेड होता, तिथं बसवलं, दोघांनी हात पाय पकडले, त्यांच्यापैकी एकानं शर्टची बटणं उघडायला सुरुवात केली. मी त्याला विरोध केल्यानंतर धक्काबुक्की करायला लागले. यावेळी पैशासाठी हे सगळं करत असाल तर करु असे मी त्यांना सांगितले. पण, तिथं पडलेलं कापड घेतलं, माझ्या तोंडावर दाबलं, गळा दाबला, मारुन टाकण्याची भीती घातली. यानंतर कापड काढून त्यांनी पिशवीतून एक दोरी काढून दाखवली. त्यांनी आम्हाला व्हिडीओ हवाय असे सांगितले. त्यासाठी १० कोटी रुपयांची ऑफर आल्याचे त्यांनी सांगितले. माझ्या जीवाला घाबरून अडचण आणणार नाही हे सांगितले. त्यांनी माझे कपडे काढले, चौथा माणूस होता त्यांनी एक बाई आणली होती. दरवाजा उघडल्यावर बाई आत घेतली. इतर दोघे बाहेर गेले. भाऊ कोळपे याने मोबाईलचा कॅमेरा बाहेर काढला, महिलेला बेडवर झोपण्यास त्याने सांगितलं. तो व्हिडीओ घेत होता. भाऊ कोळपे याने फोटो, व्हिडीओ काढले, व्हिडीओत तो सूचना देतोय, हे रेकॉर्ड झालंय. त्यानंतर महिलेला बाहेर काढल्यानतंर इतर दोघे आत आले.'



पुण्यातून या व्हिडीओसाठी समोरच्या पार्टीकडून १० कोटी रुपयांची ऑफर आल्याचे भाऊ कोळपे आणि इतरांनी सांगितल्याचे ऋषिराज पवारने म्हटले आहे. बाईक वरुन जात असताना मित्रांना मेसेज करून ठेवले होते, हा आला की त्याला पकडा असे सांगितलं होते. जसा भाऊ कोळपे आला तसा त्याला धरण्यात आले. आम्ही पकडून त्याला मित्राच्या घरात कोंडून ठेवले, असे ऋषिराज पवार यानं म्हटले आहे.

मांडवगण फराटा परिसरात गेल्या दोन-तीन दिवसांपासून वाघोली परिसरातील एक चारचाकी मोटार फिरत असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले आहे. पोलिसांनी संबंधित व्हिडिओ पाहिले असून, या घटनेमध्ये तथ्य असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. शिवाय, या घटनेमागे राजकीय मुख्य सूत्रधार असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. पोलिस पुढील तपास करत आहेत. पोलिसांकडून चौकशीनंतर अधिकृत माहिती समोर येईल. पण, सध्या तरी या प्रकरणात तथ्य असल्याची माहिती पुढे आली आहे.

काल आमदार अशोक पवार यांचे पुत्र ऋषीराज पवार यांच्याबाबत झालेला प्रकार हा निंदनीय आहे. अशा प्रकारे खालच्या पातळीचे राजकारण यापुर्वी कधीच झाले नव्हते. शिरुर हा राजकारणाबाबत सुसंस्कृत म्हणुन ओळखला जातो. हा घृणास्पद प्रकार घडवुन आणुन विरोधकांनी नक्की काय साध्य केले. योद्धा जेव्हा पराभुत होत नाही. त्यावेळेस त्याच चारित्र्य हनन केलं जात. असाच काहीसा हा प्रकार असुन जोपर्यंत या प्रकरणातील मुख्य सुत्रधाराचा पोलिस शोध लावत नाहीत. तोपर्यंत आम्ही सर्व महिला शांत बसणार नाही.

– राणी कर्डीले, सामाजिक कार्यकर्त्या